**जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.**
पत्ता :गांधी पुतळ्याजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.-१३ दिनांक. २१.०४.२०२०

वाचा:- १) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक १३.०४.२०२० ,दिनांक १५.०४.२०२० व दिनांक १९.०४.२०२०
२) या कार्यालयाचे समक्रमांकीत शुध्दीपत्रक दिनांक २०.०४.२०२०
३) साथरोग प्रतिबंध कायदा १८९७
४) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५.
५) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचनाक्र. करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२०.
६) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दिनांक १५.०४.२०२०, दिनांक १७.०४.२०२०,दि.१८.०४.२०२० व दिनांक २१.०४.२०२०.

**विषयः कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत.( नांदेड जिल्हयात फौजदारी प्रक्रिया दंड संहीतेचे कलम १४४ ची मुदत (दि. २०.०४.२०२० ते दि.०३ मे २०२० पर्यंत)**

## सुधारित आदेश

ज्याअर्थी,या कार्यालयाचे संदर्भ क्र.०१ वरील आदेशान्वये जिल्हयात फौजदारी प्रक्रिया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ नूसार मनाई आदेश दिनांक ०३ मे, २०२० रोजी मध्यरात्री २४.०० वा. पर्यंत ग्रामीण, नागरी व औद्योगिक क्षेत्रात जमावबंदी आदेश, नियमावली आणि उपाययोजनासह लागू करण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्र.०२ वरील शुध्दीपत्रकान्वये शासकीय, निमशासकीय आस्थापना, अत्यावश्यक वैद्यकीय सेवा देणारी आस्थापना व त्यांच्याशी निगडीत दुकाने वगळता ईतर सर्व आस्थापना, दुकाने **(केवळ अशा आस्थापना, दुकाने ज्यांना संदर्भीय आदेश क्र.०१ नुसार चालू ठेवण्यास मुभा देण्यात आलेली आहे )** हे केवळ **सकाळी ७.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत** चालू राहतील असे याव्दारे आदेशित केले आहे.

तथापि संदर्भ क्र.०६ वरील राज्यशासनाचे आदेश दिनांक २१.०४.२०२० अन्वये प्राप्त निर्देशानूसार या कार्यालयाचे संदर्भ क्र.०१ नमूद दिनांक १९.०४.२०२० मधील जमाबंदी आदेशामध्ये नमुद बाबीमध्ये खालील प्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

- संदर्भीय आदेश दिनांक १९.०४.२०२० मधील मुळ मुद्दा क्र.११ (i) मधील

*"प्रसारमाध्यमासह इलेक्ट्रॉनिक मिडिया ज्यामध्ये डीटीएच आणि केबल सेवेचा समावेश असेल.( **तथापि वृत्तपत्र, दैनिक, मासिके यांचे घरपोच वितरण करता येणार नाही**)"*

**ऐवजी**

" प्रसारमाध्यमासह इलेक्ट्रॉनिक मिडिया ज्यामध्ये डीटीएच आणि केबल सेवेचा समावेश असेल ( वृत्तपत्राची घरपोच सेवा मागणीदाराला पूर्वकल्पना देवून सुरू करता येईल. तथापी घरपोच वृत्तपत्र, दैनिक, मासिके वितरण करणा-या व्यक्तिने चेह-यावर मास्क वापरणे, हाताला वारंवार सॅनेटायझरचा वापर करणे आणि सामाजिक सुरक्षेच्या मानकाची पुर्तता करणे या अटिवर वृत्तपत्र, दैनिक, मासिके यांचे घरपोच वितरण करणेस परवानगी देण्यात येत आहे) ".



Scanned with CamScanner

**जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.**
पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१,    Email :nandedrdc@gmail.com

- संदर्भीय आदेश दिनांक १९.०४.२०२० मधील मुळ मुद्दा क्र.११ (V) मधील

*"ई-कॉमर्स कंपनीच्या कामासाठी वापरण्यात येणारी वाहने आवश्यक त्या परवानगीसह चालू ठेवता येतील. ज्यामध्ये अन्न, औषधे, वैद्यकिय उपकरणे आणि* ***विद्युत आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे*** *या सारख्या सर्व प्रकारचे वस्तू आणि मालाचा पुरवठा "*

**ऐवजी**

*"ई-कॉमर्स कंपनीच्या कामासाठी वापरण्यात येणारी वाहने आवश्यक त्या परवानगीसह चालू ठेवता येतील. ज्यामध्ये जीवनावश्यक वस्तू, अन्न, औषधी आणि वैद्यकिय उपकरणे"* असा बदल करण्यात येतो.

- संदर्भीय आदेश दिनांक १९.०४.२०२० मधील मुळ मुद्दा क्र.११ (XIII) मधील

*"कन्फेशनरी, फरसाण, मिठाई दुकाने (उक्त ठिकाणी खाण्याची बैठक व्यवस्था नसावी)"* **हि परवानगी (वगळण्यात) रद्द करण्यात येत आहे.**

सदरील आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह यांनी साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

तसेच यापूर्वी या कार्यालयाने निर्गमित केलेले संदर्भ क्र.०१ वर नमूद आदेश व संदर्भ क्र.०२ वर नमूद शुध्दीपत्रकाव्दारे दिलेले वेळेचे बंधन इत्यादीसह अंमलात राहील.

हे आदेश दि.२१.०४.२०२० रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

**(डॉ.विपीन इटनकर)**भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**प्रतिलीपी - आवश्यक कार्यवाहीस्तव**

३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
४. पोलीस अधिक्षक, नांदेड
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
६. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
७. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व तालुका दंडाधिकारी नांदेड जिल्हा
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड
१०.जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड.
११.व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड
१२.अधिष्ठाता,डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णूपूरी नांदेड.
१३.सहायक कामगार आयुक्त, नांदेड
१४.जिल्हा माहीती अधिकारी नांदेड
१५.केंद्र संचालक आकाशवाणीकेंद्र नांदेड याना प्रसिध्दीस्तव.

**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

Darade PC CORONA

Scanned with CamScanner